विद्यावर्धिनी संचालित,
अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय
वसई रोड (प.), जि. पालघर – ४०१२०२
(मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

मराठी विभाग
आणि
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal



## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)


CamScanner

26) संत साहित्यातील विद्रोह
प्रा. डॉ.राजेंद्र महादू आचार्य, रायगड ||138

27) संत ज्ञानेश्वर ते गाडगे महाराज चार संतांचे सामाजिक प्रबोधन
प्रा. मल्हारी पवार, शिवळे ||143

28) संत साहित्यात संत कवयित्रींचे योगदान
बिन्नर बंडू वसंत, डॉ.इंगळे नंदकुमार ||147

29) संत साहित्य आणि पर्यावरण
रमेश नागेश सावंत, मुंम्बई ||151

30) मराठीतील संत कवयित्रींचे साहित्य
प्रा. डॉ. राजू शंकर शनवार, ठाणे ||156

31) संत साहित्य आणि पर्यावरण
श्री.यशवंत तुकाराम सुरोशे, जि.– ठाणे ||160

32) संत साहित्य आणि समाज प्रबोधन
डॉ. स्नेहा सुवास प्रभु महांबरे, गोवा ||165

33) संत मीराबाईंचे नाव (मीराबाई, मीरांबाई की मीराँबाई?)– समन्वयाची एक दिशा
प्रा.मॅक्सवेल लोपीस ||171

34) संत एकनाथ व संत तुकाराम महाराज यांच्या काव्यातील मन विषयक विचार: एक अभ्यास
प्रा. नामदेव छबुराव तळपे, प्रा. डॉ रमाकांत कराड ||176

35) संत तुकारामांचे अभंग व वर्तमान समाज
डॉ.रविंद्र डाखोरे, जि. अमरावती ||180

36) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले, जि. परभणी ||182

37) संतसाहित्य आणि लोकसाहित्य
ज्योनस व्हेलेंटाईन वसईकर, डॉ. शत्रुघ्न फड ||187

38) संत साहित्य आणि पर्यावरण
संदीप देवीदास पगारे, डॉ. तुषार चांदवडकर ||191

39) राष्ट्रसंत तुकडोजी के काव्य में प्रगतिशील चिंतन की अभिव्यक्ति
डॉ. गाडीलोहार बन्सीलाल हेमलाल, नाशिक ||196



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

**37**

# संतसाहित्य आणि लोकसाहित्य

ज्योनस व्हेलेंटाईन वसईकर

डॉ. शत्रुघ्न फड

***********

सर्वसामान्य लोकांचे साहित्य म्हणजे 'लोकसाहित्य'. लोकसाहित्य हे लोकांच्या जगण्यातून प्रकट होत असते. लोकजीवनामध्ये ज्या—ज्या गोष्टी परंपरेने चालत आलेल्या आहेत, ज्यात अनेक रूढी सामावलेल्या आहेत, ज्यात लोकसमजुती आहेत, ज्यामध्ये विविध धार्मिक विधींचा समावेश आहे, तसेच लोकभ्रम व आचार—विचार ज्यात दिसून येतो, त्यास 'लोकसाहित्य' असे म्हणतात. सामान्य लोकांकडूनच लोकसाहित्याची निर्मिती होत असते. लोकांकडूनच निर्मिती होत असल्यामुळे लोकांनाच त्या लोकसाहित्याचे जनक म्हटले पाहिजे. लोकसाहित्य हे सहजपणे निर्माण होत असते. ते सर्व लोकांचे असल्यामुळे त्यास विशिष्ट असा कर्ता नसतो. लोकसाहित्य हे कधीही एका व्यक्तीचे नसल्यामुळे ते अनामिक असते.

लोकसाहित्य हे लोकजीवनाचे जीवनाविष्कार घडविणारे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. त्याचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सातत्याने व परंपरेने होत असते. वास्तविक लोकसाहित्याचा उगम आदिवासी आणि वन्य जमाती तसेच ग्रामीण भागातील लोकसमुहांत झाला. लोकसाहित्याचे संक्रमण होत असल्यामुळे त्याद्वारे लोकजीवनाचे व लोकसंस्कृतीचे दर्शन घडण्यास मदत होत असते. लोकसाहित्यात संस्कृती ओतप्रोत भरलेली असते. म्हणून 'संस्कृतीचा मौल्यवान ठेवा म्हणजे लोकसाहित्य होय.' लोकसाहित्यात लोकांचे जीवन (आत्मा) सामावलेले असते त्यामुळे ते जिवंत स्वरूपाचे साहित्य वाटते. लोकसाहित्य व लोकजीवन यांचे अतूट नाते आहे. त्यांच्यातील असलेले हे नाते—संबंध आई—मुलाच्या नात्यासारखे आहे. लोकांच्या जीवनातून लोकसाहित्य आकार घेत असते, बहरत असते, फुलत असते. लोकजीवनाचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पहावयास मिळते व त्याद्वारे लोकजीवनात दडलेल्या विशेष गुणांची जाणीव होते.

पारंपरिक जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते. एखाद्या समाजाची परंपरा जाणून घ्यावयाची असेल तर त्यासाठी त्या समाजाचे लोकसाहित्य अभ्यासले पाहिजे. हे लोकसाहित्य जाणीवपूर्वक निर्माण केले जात नाही, तर ते स्वाभाविकपणे जीवनाचा आविष्कार घडवत असते. जणू जीवनच मांडत असते. लोकसाहित्य तात्विक उद्दिष्टपूर्तीसाठी निर्माण होत नसून, तो सहजस्फूर्त जीवनाविष्कार असतो. परंपरेने चालत आलेल्या असंख्य घटनांचा समुच्चय लोकसाहित्यातून व्यक्त होतो.

लोकसाहित्याचे अभ्यास क्षेत्र हे अत्यंत विशाल व व्यापक आहे. पृथ्वीतलावर माणूस जन्माला आला तेव्हापासून तो आजतागायत हे क्षेत्र विकसित होत आहे. लोकसाहित्याचा अभ्यास करीत असताना अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. अगदी सुरुवातीच्या काळापासून चालत आलेल्या किंवा स्थित असलेल्या गोष्टींचे केवळ निरीक्षण, संकलन व वर्गीकरण करून भागत नाही तर त्यात, ज्या गोष्टी समाजात रुजलेल्या आहेत, लोकमाणसांमध्ये बिंबलेल्या आहेत अशा गोष्टींचाही शोध घ्यावा लागतो. जीवनरुपी सागरातून सुखरूपपणे तरुण जाण्यासाठी व मनाला सांत्वन मिळविण्यासाठी अनेक गोष्टी लोकमानसांमध्ये दिसून येत असतात. साहित्य आणि लोकसाहित्य यातील रचनांमध्ये लोकमानस दडले आहे. त्या रचनांमागे एक लोकतत्विय अधिष्ठान आहे. त्या रूपकांकडे जाण्यापूर्वी लोकसाहित्य, लोकमानस व संतसाहित्य या संकल्पनांचा थोडक्यात परामर्श घेऊ या.

'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'Folk-lore' (फोकलोअर) या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्यायी शब्द म्हणून वापरला जातो. म्हणजेच 'folklore' च्या कक्षेत जो आशय सामावलेला आहे, तोच आशय 'लोकसाहित्य' या शब्दातही समाविष्ट होतो. इंग्रजीतील

'folklore' या शब्दाच्या अर्थाची जी व्याप्ती आणि महत्त्व आहे, तीच व्याप्ती आणि महत्त्व मराठीतील 'लोकसाहित्य' या शब्दालाही आहे.

लोकसाहित्याच्या संदर्भात लोकगीत व लोककथा यांचाही वापर केला जात होता, पण या शब्दांना मर्यादा असल्यामुळे यांतून व्यापक अर्थ अभिप्रेत होत नाही. लोकसाहित्याच्या विशिष्ट प्रकारासाठी ही संज्ञा स्वीकारण्यात येते. सतराव्या शतकामध्ये लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात झालेली असली, तरी १८४६ मध्ये विल्यम जॉन थॉमघ्स याने लोकसाहित्याच्या सामग्रीसाठी 'folklore'(फोकलोअर) ही संज्ञा प्रथम वापरली व ती जगभर रुळली. महाराष्ट्रात लोकसाहित्याची मांडणी १८५८ पासून सुरू झालीय व खऱ्या अर्थाने त्याचा अभ्यास इ.स. १६१५ पासून होऊ लागला. दत्तो वामन पोतदार यांनी इंग्रजीतील 'folklore' चे भाषांतर म्हणून 'लोकविद्या' हा शब्द वापरला. परंतु हा शब्द तितका लोकप्रिय झाला नाही. नंतरच्या काळात 'लोकसाहित्य' हा शब्द वापरण्यात आलाय तसेच 'विसासवतम' साठी 'लोकवाङ्मय' हा प्रतिशब्दही रूढ झाला आणि 'लोकवाङ्मय व लोकसाहित्य' हे दोन्ही शब्द वापरण्यात येऊ लागले. रा. चिं. ढेरे यांच्या मते 'folklore' याचा अर्थ 'लोकविद्या' आणि लोकप्रचलित बाबींच्या अभ्यासाचे शास्त्र होय.

'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिक शब्द वापरून त्यातील अर्थाचे व्यापकत्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते लोकसाहित्य हा शब्द इंग्रजीतील 'folklore' या शब्दाचा केवळ शाब्दिक पर्याय नाही, तर 'folklore' मध्ये अभिप्रेत असलेल्या आशयांचा तो पर्याय आहे. समूह जीवनातील सर्व शारीरिक, मानसिक धारणा व आचरण यांचा आविष्कार लोकसाहित्यात होत असतो, म्हणूनच समूहाच्या जीवनसरणीतील कथा, गीते, उखाणे, म्हणी इत्यादी शब्दसाहित्याबरोबरच लोकजीवनातील श्रद्धा, समजुती, चालीरीती, भ्रम, कला, कारागिरी, देव—देवता, व्रतवैकल्ये, विधी—विधाने, क्रीडा या सर्वांना मिळून व्यापक अर्थाने 'लोकसाहित्य' ही संज्ञा मराठीत रूढ झाली.

लोकसाहित्य या शब्दासाठी 'लोकवाङ्मय' हा शब्द वापरण्यात येतो. श्राव्य किंवा बोली स्वरूपात चालत आलेले वाणीने म्हणून लोकवाङ्मय हे नाव सार्थ आहेच. परंतु 'लोकवाङ्मय' ही संज्ञा विषयाची व्याप्ती मर्यादित करते, असे दुर्गा भागवत यांचे मत आहे. म्हणजेच लोकसाहित्यातील विषयाची, त्यात असलेल्या आशयाची व त्यात सामावलेल्या अभिव्यक्तीची विविधता शोधायची किंवा अभ्यासायची असेल तर 'लोकवाङ्मय' या शब्दाला पर्यायाने मर्यादा पडतात, असेच म्हणावे लागते.

**संतसाहित्य :**

संतसाहित्य म्हणजे संतांनी लिहिलेले व संतांविषयी असलेले साहित्य होय. ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत व त्यांच्या प्रभावळीत येणाऱ्या अनेक संतांनी ज्या रचना केल्या तर सर्व रचनांना संत साहित्य म्हटले जाते. यात संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी चांगदेवपासष्टी, अमृतानुभव, नामदेवांची नामदेवगाथा, तुकारामांची तुकारामगाथा, नाथांचे चतु:श्लेकी भागवत, एकनाथी भागवत रुक्मिणीस्वयंवर, भावार्थरामायण अशा संतांनी केलेला रचना संतविषयक वाङ्मयात येतात. संतांनी आपले परमार्थ मार्गातील भावानुभव आपल्याला आलेल्या प्रचिती यातून व्यक्त केल्या. हे सर्व लोकसाहित्याला जवळचे आहे. लोकसाहित्य वाटावे अशा आख्यानकथा, ओवी, अभंग ते रचीत राहिले. संतांच्या आकांक्षा, त्यांच्या श्रद्धा, त्यांचे आचार—विचार, त्यांची दैवते, त्यांच्या उक्ती व कृती हे सर्व संतसाहित्यात आहे. मध्ययुगीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण आविष्कार ठरलेल्या या मराठी साहित्याचा अभ्यास लोकतत्वीय दृष्टीने करणे कसे गरजेचे आहे हे रा.चि. ढेरेंनी त्यांच्या 'मराठी संस्कृतीचे उपासक', 'संतांच्या चरित्रकथा' पुस्तकात केले आहे.

**संतसाहित्य आणि लोकसाहित्य : अनुबंध —**

दिनदुबळ्यांचा, भोळ्या भाबड्या सामान्य जणांचा उद्धार करण्याची संतांना अतिशय तळमळ असल्याने त्यांनी लोकजीवनाचा सखोल अभ्यास केला. संतांचे उद्दिष्ट मोक्ष, मुक्ती असे पारमार्थिक असले तरी लोकांची दैनंदिन जीवनाशी संबंधित दु:खे व्याधी त्यांनी कनवाळूपणे पाहिली. तसेच आपला पारमार्थिक उपदेश समाजाच्या तळागाळापर्यंत जावा हाही त्यांचा प्रयत्न होता. या

तळमळीतून लोकांच्या मनावर परिवर्तन घडवू शकणाऱ्या अशा प्रचलीत लोकप्रिय अशा माध्यमांचा त्यांनी उपयोग करून घेतला. स्त्री व शूद्रांना ज्ञानाचे दरवाजे बंद करणाऱ्या देव भाषेला संस्कृतला दूर करून मराठीतून अभिव्यक्ती करण्याचा पायंडा ज्ञानेश्वरांनी पाडला. आणि मग तीच वाट अंगिकारण्याची बंडखोरी बाकीच्या संतकवी कवयित्रींनी केली. संतांनी देशी भाषेतून आणलेले आपले विचार मांडायला प्रारंभ केल्याने ते लोकांच्या अधिक जवळ गेले. हे नुसते पुस्तकी पंडित्य सांगणारे नाहीत तर स्वानुभवाला प्रमाण मानणारे असल्याने लोकांना ते आपले वाटले. संतांनी नुसती भाषीक बंडखोरी केली नाही तर तत्कालीन जन माणसांचे विविध देवदेवता, विविध व्रतवैकल्ये सणसमारंभ विविध संस्था यांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांचे बाह्यरूप तसेच ठेवून त्याच्या आधारेच परमार्थनिरूपण करायला सुरुवात केली.

संतांच्या रूपकात्मक रचनांमधून म्हणजेच भारुडे, गौळणी, विरहिणी कोल्हाटीण, वासुदेव, डोंबारी वगैरेतून हे लोककत्व व्यापकरीत्या प्रकट झाले आहे. संतांच्या या रूपकात्मक रचना बाह्यरुपात लौकीक अर्थ व्यक्त करतात. तर अंतरंगाने अलौकीक अर्थ प्रकट करतात. त्यांच्या ज्ञानेश्वरांच्या रूपकातील परमेश्वराची वाट पाहणारा भक्त प्रेयसीचे विरहिणीचे रुप घेतो आणि त्याला कावळा ओरडण्याचे शुभशकून होतात. दारात कावळा ओरडला की प्रियजनाचे आगमन होते असा लोकमानसात संकेत आहे. त्याचा उपयोग प्रस्तुत अभंगात करून भक्तरुपी विरहिणी त्याला विचारते " पाहुणे पंढरी राहू घरा कै येती? आणि मग पंढरी राहू येणार असल्याचा संकेत जर तो देणार असेल तर दहीभाताची हंडी, दुधे भरूनी वाटी आणि याच्यापुढेही जाऊन सोनियाने पाऊले मडविण्याचे आमीष दाखवते. अशा हजारो सर्वश्रुत आणि लोकप्रिय गोष्टींचा समावेश संत साहित्यात झाला आहे. याच्यामागे त्यांचा हेतू लोकजागृतीचाच होता. लोकांच्या अगदी जवळ जाऊन त्यांच्या सोबत राहून जवळीकीने त्यांचे हदगत समजून घेऊन त्यांच्या पद्धतीने बोलून चालून त्यांचे उन्नयन करण्याचा संतांचा प्रयत्न त्यांच्या साहित्यात दिसतो. संतांचा आशय ऐहिकाच्या पल्याडचा निश्चितच आहे. पण त्यानी अभिव्यक्ती पूर्णत: ऐहिकाच्या पातळीवरची आहे. त्यामुळेच संपूर्ण लोकसाहित्य पारमार्थिक बनले. "१

संत आणि लोक यांच्या जवळीकेत लोकसाहित्य व संत साहित्य यांच्या अनुबंधांचे गुपित साठवले आहे. संतांनी लोकभाषेचा त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा समजूतींचा आणि अभिव्यक्तीचा सुद्धा स्वीकार केल्यानेच संतांचा विचार लोकांपर्यंत जाऊ शकला. तो विचार जनसामान्यांनी नुसता स्वीकारलाच नाही तर शिरोधार्य मानला. आपली अभिव्यक्ती ओवी अभंगांतून त्यांनी लोकांपर्यंत आणली. त्यामुळे संपूर्ण संत साहित्य पारमार्थिक लोकसाहित्य बनले.

**ओवी आणि अभंग —**

मराठी संतकवींचा हा आवडता छंद आहे. यात वर्ण मात्रा यांची संख्या अनियमित असते. तरीसुद्धा अष्टाक्षरी औटचरणी व अष्टाक्षरी त्रिचरणी असे दोन प्रकार पडतात. मौखिक ओवी हे या दोन्ही छंद प्रकारांचे मूळ असून अभंग हे या ओवीचेच मालात्मक रूप आहे. महाराष्ट्रातील स्त्रिया दळण कंडण करताना ओव्या गातात. ओवीच्या मालिकेला अभंग म्हणत असले तरी अभंग या नावाला आणखी एक वेगळा अर्थ आहे. तेराव्या शतकातील कानडी कवी सौंडरस हा विठ्ठलाला 'अभंग विठ्ठल' असे म्हणतो. त्यावरून श्रीविठ्ठलविषयक ओव्यांना अभंग हे नाव प्रचलित झाले असावे. विठ्ठलाच्या अभंग या नावामागे एक रहस्य असे आहे की तो वृंदावनातील देहुड्य कृष्णाप्रमाणे त्रिभंग उभा नसून समचरणांवर अभंग अवस्थेत उभा आहे. म्हणजेच विठ्ठल— भक्तिसंप्रदायात प्रचलीत असलेल्या या शब्दाचे नावही विठ्ठलाच्या रूपविशेषांशी निगडित आहे. ओवी प्रमाणेच अभंग छंदातही निवृत्ती ज्ञानदेवांपासून तुकारामांपर्यंत अनेक संतांनी विपुल रचना केली.या दोन छंदापैकी एकातून दुसरा म्हणजे ओवीतून अभंग उत्क्रांत झाला. उदा. इवलेसे रोप लावियेले दारी ॥ त्याचा वेलु गेला गगनावरी ॥ मोगरा फुलला मोगरा फुलला ॥ फुले वेचिता बहरू कळियासी आला ॥

एखाद्या मोगऱ्याच्या वेलीने मांडव पाहता पाहता भरून जावा त्याच्या कळ्यांनी सारा आसमंत गंधित



CS CamScanner

होऊन जावा तसे भक्तांच्या मनातले इवलेसे आत्मत्व आकाशभर होते वगैरे, अशा प्रकारच्या रूपकात्मक अभंगात लौकिक अर्थ पाहू जाता ती विनोदासाठी निर्माण झाली असे वाटते पण त्यात लौकीक अलौकीक अर्थाबरोबर लोकमानसही व्यक्त होतो. तिथे लोकसाहित्य व संतसाहित्य हातात हात घालून समाजहितासाठी सिद्ध झालेले दिसते.

**भारुडे —**

'भारुड म्हणजे बहुरूड गीत' २ भारुड या प्राकृत शब्दाचा अर्थ दोन तोंडांचा पक्षी. त्यावरून आलेल्या या गीत प्रकारालाही दोन अर्थ असतात एक वाच्यार्थ तर दुसरा लक्ष्यार्थ म्हणजेच एक व्यावहारिक आणि दुसरा पारमार्थिक असतो.

**ज्योतिषी आणि त्यांच्यावरील भारुडे —**

लोकांच्या घरोघरी जाऊन भविष्य सांगणारे ज्योतिषी असतात. लोकांचा त्यांच्यावर विश्वास असतो. हा व्यवसाय परंपरेने चालत आलेला आहे. वैयक्तिक तसेच गावाचेही हे लोक भविष्य सांगतात. नाथांच्या काळात आपल्या तुटपुंज्या ज्ञानावर हे लोक पुढे पुढे भोळ्या भाबड्या लोकांची फसवणूक करू लागले. म्हणूनच ग्रामजोशीसारखे ज्योतिषी सरोदे पिंगळा यासारख्या शकून सांगणाऱ्या लोकसंस्थाही त्यापैकी एक होय. नाथांचा जोशी हा राजा पाटील बुवाला सांगतो

'एका बायकोची संगत घडली द्य त्याने तुझी महिमा बुडाली द्य तेव्हा आता तिचा संघ टाकी दादा द्य बरवा चालेल तुझा धंदा द्य३ लोकजीवन जगण्यातील उपाय येथे मांडण्यात आलेला आहे.

**लोकरंजक संस्था आणि भारुडे—**

समाजात मनोरंजन करणाऱ्या लोककलावंतांच्याही अनेक जाती आहेत जसे कोल्हाटी, कोल्हाटी कसरती करून, गारुडी नागांचे खेळ करून, डोंबारी कसरतीचे प्रयोग करून लोकांचे मनोरंजन करतात. नाथांच्याकाळी या जाती विशेष लोकप्रिय असाव्यात त्यामुळेच नाथांनी अध्यात्म विचाराचा लोकांमध्ये प्रसार करण्यासाठी आधार घेतला.

**लोकदैवतांचे भगत आणि भारुडे —**

निरनिराळ्या दैवतांबरोबर त्यांच्या भक्तांचाही नाथांच्या भारुडात उल्लेख आहे. गोंधळी, भुते, पोतराज यांच्या जागरणांना कुलाचाराची प्रतिष्ठा तेव्हाही होती. आताही आहेच. हे ओळखून नाथांनी त्यांच्यावर भारुडे रचली. त्यांचा आशय अध्यात्माचा पण बाह्यांग मात्र तत्कालीन भक्तांचे आहे. या अभंगाची रचना करताना त्यांनी लोकगीतसरणी स्वीकारली.

**तुकारामांचे अभंग —**

नाथांप्रमाणे तुकारामांचेही अभंग लोकोद्धाराचे कार्य करतात. संत तुकारामांपुढे लौकीका—पारलौकिका यांच्याबरोबरच अज्ञानी, स्वार्थी आप्तस्वकीय भोंदू गुरु, महंत होते. त्यांच्या उद्धाराची तुकारामांना तळमळ होती. सासू सुनेच्या नातेसंबंधांवरील त्यांचे रूपक पुढीलप्रमाणे—

आवा चालली पंढरपूरा द्य वेशीपासूनी आली घरा द्य परिसे ग सूनबाई द्य नको वेचू दूधदही द्य माझे हातीचा कालवडु द्य मजवाचूनी नको फोडू द्य वळवटक्षिरीचे लिंपन द्य नको फोडू मज वाचून द्य उखळ मुसळ जाते द्य माझे मन गुंतले तेथे द्य भिक्षुक आल्या घरा द्य सांग गेली पंढरपुरा द्य४ वरील अभंगाच्या माध्यमाद्वारे मनोरंजन आणि उद्बोधन करतात.

अशा प्रकारे संत ज्ञानेश्वरांपासून संततुकारामापर्यंत व अन्य संतांच्या रचनेत असा लोकतत्वे दृष्टिकोन दिसतो. या दृष्टिकोनामुळे साहित्याचे आकलन अधिक सुलभ होण्यास मदत झाली आहे. पण आपल्या जीवनात आजही ठाण मांडून बसलेल्या अनेक रूढी, कल्पना, चालीरीती उलगडण्यास हे साहित्य मदत करते. लोकसाहित्य— संत साहित्य हे व्यापक आहे, अवघ्या जीवनाला ते व्यापल्याचे दिसून येते. लोकातत्वीय दृष्टीने भूतकाळ व भविष्याचीही ते सांगड घालते. आणि म्हणूनच संतवाङ्मय अजरामर झाले आहे.

**संदर्भ :**

१ संतसाहित्य आंणि लोकसाहित्य — श. चि. ढेरे, पृ. १६

२ नायदेरगांथा — गाथा समिती प्रकाशन, १७४९, पृ. ६८०

३ मायबोलीची कहाणी — डॉ. ना. गो. नांदापूरकर पृ. १७२

४ संतांच्या चरित्रकथा — रा. चि. ढेरे

५ लोकसाहित्याचे स्वरुप — डॉ. प्रभाकर मांडे



CS CamScanner